# शा.वि.ज्ञा.वि.संस्था (स्वायत्त) येथे संगीत मंडळाचे उद्‌घाटन संपन्न



अमरावती दि. १४ : दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी शा.वि. ज्ञा.वि. संस्थेच्या संगीत अभ्यास मंडळाचे उद्धाटन मुख्य सभागृह येथे पार पडले. या उद्धाटन समारंभाला संस्थेचे संचालक डॉ.सतीश माळोदे हे अध्यक्षपदी विराजमान होते तर अमरावतीतील सुप्रसिद्ध ओडीसी नृत्य गुरू मा.प्रा.डॉ. मोहन बोडे हे या सोहळ्याला उद्धाटक म्हणून लाभले.

संगीत विभागातील माजी विद्यार्थ्यांचा 'स्वराभिषेक' गीत गायनाचा कार्यक्रम संस्थेच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. हा सोहळा अभ्यास मंडळाचे उद्धाटन आणि स्वराभिषेक मैफिल अशा दोन पुष्पा मध्ये गुंफण्यात आला.

या वेळी संगीत विभाग प्रमुख डॉ.पूर्णिमा दीवसे व डॉ.सुधीर मोहोड मार्गदर्शक म्हणुन लाभले.या संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा व उद्देश संगीत अभ्यास मंडळाच्या प्रभारी प्राध्यापक डॉ. मुक्ता महल्ले यांनी त्यांच्या प्रस्ताविकपर भाषणाव्दारे स्पष्ट केले. यावेळी युवा महोत्सवांमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थी मोहम्मद अफसार , क्रिश आत्राम,मनवा मोरे, परमेश्वरी शेलोटकर, ईश्वरी नागापुरे, श्री.भाटी, प्रज्वल सोनटक्के,तसेच नेट परीक्षा उत्तीर्ण प्रा.मीनल गडवे, प्रा.प्रज्ञा इंगळे, धम्मदीप सातपुडके या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीचे कार्य हे फार महत्त्वाचेअसून, यामुळे विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव होते. तसेच अनेक दिग्गज कलाकार या संस्थेच्या संगीत विभागाने घडविले आहे, गायन, वादन आणि नृत्य या तिनही कलांचा संगम म्हणजे संगीत असून संगीत कलेविषयी असणारा आदर व महत्त्व उद्धाटक प्रा. डॉ. मोहन बोडे यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून सांगितले. संगीत विभागप्रमुख मा. डॉ. पूर्णिमा दिवसे यांनी विद्यार्थ्यांना सांगितिक कार्य करण्यासाठी अनमोल असे मार्गदर्शन केले व असेच नवनवीन उपक्रम अभ्यास मंडळाद्वारे वर्षभर राबविण्यात यावे अशी अशा व्यक्त केली आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संगीत विभाग हा दरवर्षी नवीन उपक्रम राबवित असतो याचे कौतुक आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे सांगितिक कौशल्याचा विकास होतो, असे संस्थेचे आदरणीय संचालक डॉ. सतीश माळोदे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून स्पष्ट केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'स्वराभिषेक' हे द्वितीय पुष्प होते. या संगीत मैफिली मध्ये शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील संगीत विभागातील माजी विद्यार्थ्यांनी आपले आपले गायन तयारीनिशी सादर केले.या 'स्वराभिषेक' कार्यक्रमांमध्ये प्रणित वानखडे, अजिंक्य वानखडे, प्रज्वल सोनटक्के, धम्मदीप सातपुडके, रोशन अवसरमोल, विनायकी सूर्यवंशी, आशिष कैथवास, हितेश केळकर, अमरजीत वानखडे, प्रशांत गुरनुले इत्यादी विद्यार्थ्यांनी संगीतातील विविध गीत प्रकार सादर केले. या संपूर्ण संगीत सभेला तबला वादनाची साथ प्रा. मनोज येलकिकर व संवादिनी संगत आशिष कैथवास यांनी केली. मागील दोन वर्षापासून युवा महोत्सवामध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेली कव्वाली मोहम्मद अबसार साबरी, क्रिश अत्राम, अंकित कैथवास, रोशन अवसरमोल यांनी सादर केली व उपस्थितांची दाद मिळविली.

सत्र २०२४- २५ या वर्षाच्या नवनिर्वाचित अभ्यास मंडळाच्या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष कु. सिद्धी पवार, उपाध्यक्ष मोहम्मद अबसार साबारी , कोषाध्यक्ष कु.वैष्णवी बारमाळे, सचिव कु.सोनाली खंडार, व सहसचिव श्री. संचित पांचाळे तसेच अभ्यास मंडळाचे सदस्य साहिल कणसे, वैभवी इंगळे, मोहित बिहाडे यांचा समावेश असून या कार्यक्रमासाठी संगीत विभागातील प्रा.वनिता मोहोड, प्रा. मिनल गडवे, प्रा. डॉ.अमृता काळे, प्रा.मनोज एलकिकर, प्रा. शितल महल्ले, प्रा.पुजा जिरापुरे, प्रा.प्रज्ञा इंगळे यांनी सहकार्य केले.

# थोर पुरुषांच्या कार्याची शिकवण व प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरावी : खा. डॉ. अनिल बोंडे

## रहाटगाव आय.टी.आय. ला दादासाहेब खापर्डे यांचे नाव; नामकरण समारंभ संपन्न

अमरावती दि. १४ : अमरावतीचे सुपुत्र,स्वातंत्र्य सेनानी, नावाजलेले विधिज्ञ थोरपुरुष दादासाहेब खापर्डे हे करारी व असामान्य व्यक्तिमत्व होते.त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात लोकमान्य टिळक यांचे सोबत खांद्याला खांदा लावून केलेल्या असामान्य कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली असून त्यांच्या कार्याची शिकवण व प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी नेहमीच दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोन्डे यांनी आज रहाटगाव एस सी पी आय टी आय येथील नामकरण समारंभात केले.



राज्याचे कौशल्य विकास, उद्योजक्ता, रोजगार व नावीन्यता मंत्री मा. मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकाराने रहाटगाव आय टी आय ला दादासाहेब खापर्डे यांचे नाव देण्यात आले.या नामकरण समारंभा चे उदघाट्न खासदार डॉ. अनिल बोन्डे यांचे हस्ते संपन्न झाले.प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विभागाचे सहसंचालक प्रदीप घुले, सहाय्यक संचालक रवींद्र लोखंडे, कौशल्य विकास विभागाच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर संस्थेचे प्राचार्य आनंद वाळके, उपप्रचार्य संजय महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

या नामांतर समारंभाचे सूत्र संचालन कु कावेरी म्हस्के मॅडम, प्रास्ताविक आरती यादव मॅडम यांनी .तर आभार प्रदर्शन प्राचार्य आनंद वाळके यांनी केले.या समारंभाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री सातपुते सर निस्ताने सर,मुसळे सर उबरहांडे सर, खरात सर,हरले सर, पालवे सर,शेख सर, सिसोदे सर, थोटे सर,खटाळे सर,भोकरे मॅडम, कुथे मॅडम सोनटक्के, नागे, सौ पाटील मॅडम, सौं महल्ले मॅडम, सूरज रगडे, खराळे, मनोज पच्छेल, आनंद वानखडे अमृत वानखडे,ज्योती कुमार कनोजे आदी कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.या संपूर्ण कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तक्षशिला इंजिनियरिंग आणि तंत्रज्ञान महाविद्यालयात भव्य गरबा रास उत्सवाचे आयोजन



दारापूर दि. १४ : दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी तक्षशिला इंजिनियरिंग आणि तंत्रज्ञान महाविद्यालय , दारापूर येथे गरबा रास उत्सवाची जोरदार आणि ऊर्जावान साजरी करण्यात आली, ज्यामध्ये अनेक सहभागींनी आपल्या नृत्य कौशल्याचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.टी. इंगोले यांच्या हस्ते झाले आणि त्यांच्यासोबत मान्यवर डॉ. एस.टी. वरघट, डॉ. एस.बी. यावले आणि श्री. एच.ए. धुमाळे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

डॉ. बी एस शेटे आणि डॉ. वाघमारे यांनी उत्कृष्ट गरबा खेळांना-या मुलींची निवड व पारितोषिक दिले . त्यामुळे स्पर्धकांमध्ये उत्साह आणि स्पर्धेची भावना वृद्धिंगत झाली.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा.एस.डी. गतफणे, प्रा.पी.एस. देशपांडे, प्रा. ए.पी. इंगळे, प्रा. मोना वानखडे आणि त्यांच्या टीमच्या देखरेखीखाली उत्कृष्टरीत्या करण्यात आले. शिस्त नियमन समितीने केलेले निर्दोष व्यवस्थापन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे ठरले.

सर्व सहभागी स्पर्धक पारंपारिक पोशाखात सजून, गरबाच्या तालावर नाचत आनंद घेत होते, ज्यामुळे संपूर्ण कॅम्पस ऊर्जा आणि उत्साहाने भरून गेला. सुंदर सजावट, तेजस्वी प्रकाशयोजना, आणि उत्कृष्ट नियोजित नृत्यस्थळाने वातावरण अधिक उत्साही बनवले.

कार्यक्रमाचा शेवट पारितोषिक वितरणाने झाला, जिथे उत्कृष्ट गरबा नर्तकांचा सन्मान करण्यात आला. सर्वजण पुढील उत्सवांची आतुरतेने वाट पाहत होते.

हा गरबा रास उत्सव हा केवळ परंपरेचा सन्मान नव्हे तर तक्षशिला संस्थेच्या एकतेचा आणि संस्कृतीचा देखील एक आदर्श होता.

# खेळ

लगोरी, गोटे, कंचे, फुगडी, हात लावणी
खेळ अनेक होते आमच्या लहानपणी
भुर्र दिश्या उडून गेली खेळाची दुनिया
दैवाने रचली नवीन किमया
कपटी बनून मात कशी करायची
याची सुध्या शिकवणी लावायची
कोणा सोबत बोलायचे गोड
पाय कसा खेचायचा याची लागली होड
मुखवटे लाऊन कशे वावरायचं
खोटं बोलून सर्वांना सावरायचं
आपलाच खिसा भरेल कसा
दुसऱ्याच्या दुःखाचा कसा करायचा हशा
आयत्या गोष्टीवर मारायचा कसा ताव
चेहऱ्यावर आणायचा कसा गरिबीचा भाव
शिकता शिकता खूप झाले शिकुन
आनंद घ्यावा लागतो शब्द पैशात विकुन.

**सौ.अर्चना गुरुदत्त बेलसरे**
**शेगाव नाका, अमरावती मो. ९४२१६१४९९०**

# खरा सामाजिक उद्योगपती हरपला : संजय जाधव



अमरावती दि. १४ : दि.९ आक्टोंबर ला उद्योग क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तीमत्व व भारताचे रत्न म्हणून नावलौकिक प्राप्त रतनजी टाटा यांचे दुःखद निधन झाले. देशाकरीता समर्पण भावनेने,उद्योजक म्हणून योगदान दिलेल्या या लाडक्या देशप्रेमी ला शिवटेकडीवर गुरुवारी सकाळी १० वाजता श्रध्दांजली वाहण्यात आली.याप्रसंगी या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते श्री.रामेश्वर अभ्यंकर उपस्थित होते.या कार्यक्रमा अंतर्गत विदर्भातील प्रसिद्ध उद्योगपती श्री.संजय जाधवांनी स्व.रतनजी टाटा यांना श्रद्धांजली वाहताना सांगितले की, माझ्या उद्योग क्षेत्रातील आदर्श जर कोणी असेल तर ते टाटासाहेब होते. देशा करीता समर्पण भावनेने उद्योगाच्या माध्यमातून सेवा देवून सात्विक मनाने संपत्ती ची प्राप्ती केली.प्राप्त मिळकती मधून समाजातील दुर्बल घटकांना,तसेच दुर्बल घटकां करीता कार्य करणाऱ्या संस्थांना ते फार मोठ्या प्रमाणात निस्वार्थीपणे आर्थिक सहकार्य करीत होते.खुप मोठी उंची असलेल्या पण अत्यंत साधेपणाने जिवनाचा प्रवास करणाऱ्या भारताच्या या रत्नाच्या निघून जाण्याने आपल्या देशाची मोठी हानी झाली आहे.त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून उद्योग क्षेत्रात कार्य करीत रहाणे.हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. आपल्यातून खरा सामाजिक उद्योजक हरपला आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष रामेश्वरभाऊ म्हणाले की,स्व.टाटा हे सेवाभावी होते.धार्मीक मतभेद न ठेवता समाज मनाला सन्मान देणारे होते.मुक्या प्राणीमात्रांना अभय देण्याच मोठं निस्वार्थी कार्य या मानवाने केले.देशाची गरज लक्षात घेऊन त्यांनी अनेक उद्योग सुरू केले.युवकांनी त्यांच्या सर्व पैलूंचा अभ्यास करण्याची गरज आहे.यशस्वी व आदर्श उद्योगजक होण्यासाठी याची या बाबी खुप महत्त्वाच्या आहेत. आपण खऱ्या अर्थाने भारत रत्ना वंचित झालो.या प्रसंगी उद्योजक दिलीप दाभाडे,डव्होकेट सुनील पडोळे,रवि महल्ले, सुनील देशमुख, कंत्राटदार प्रकाश राऊत, रमेशभाई परमार, चंद्रशेखर खंडारे, सुभेदारजी, माझी महापौर संजय नरवणे, प्रकाश उर्फ दादासाहेब धोटे, मुख्याध्यापक चंद्रशेखर देशमुख,शेखर भरणे, राजेंद्र पाटील, गजेंद्र राजगुरे , सुकेश ढोले, मनोजकुमार आखरे, किशोर बोरकर, मनोहर दिक्षित, प्रवीण वाडेकर, गुड्डूभाऊ साखरे, वासुदेव क्रीशवानी, हसनदास हेमवानी चंपालाल, अलीमभाई,व इतर पहाटे फिरायला येणारे नागरिक इत्यादी या कार्यक्रमाला उपस्थित होते.सूत्र संचालन राजेश पिददी जनसंपर्क अधिकारी डायबेटिक असोसिएशन अमरावती यांनी केले.शेवटी सामुहिक दोन मिनिटे मौन पाळून स्व.रतन टाटांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# राष्ट्रवादीचे तालूका अध्यक्ष भूषण यावले यांचा राजीनामा

तिवसा दि. १४ : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाअध्यक्ष प्रदीप राउत यांना विचारात न घेता, विधानसभा निवडणूकीतल्या तोडावर पदावरून पायउतार केल्यामूळे तिवसा तालूका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालूका अध्यक्ष भूषण यावले यानी आपला पदाचा राजीनामा पक्षश्रेष्ठ कडे पाठवला आहे.

राष्ट्रवारी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा अध्यक्ष प्रदीप राउत याची निवड झाली असताना, पक्षाला नवसंजीवनी प्राप्त झाली होती. संपूर्ण जिल्ह्यात पक्ष बांधणीचा कार्यक्रम सुरु असताना व येत्या काही दिवसांत विधानसभा निवडणूक लागत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षाना जर पदावरून काढत असेल तर ते अन्यायकारक आहेत. यासंदर्भात अमरावती विभागाचे अनिल देशमुख व उमेश बंग विभागाचे पक्ष निरिक्षक याना जाब विचारू असे भूषण यावले यानी पत्रकार परिषद मध्ये व्यक्त केले.



पत्रकार परिषदेला तिवसा तालूका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालूका अध्यक्ष भूषण यावले, प्रविण केने, दिनेश गंधे, दिनेश मोहतूरे, सिकंदर मनोहर, ब्रा. नरेश इंगळे, शरद खवले, किशोर स्वर्ण, रोशन अढाऊ, अमोल पाटील, राजाभाऊ किरकटे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या तालुका अध्यक्ष भूषण यावले यांनी दिलेल्या राजीनाम्यामूळे तालुक्यातील वातावरण ढवळून निघाले आहेत.

# विहीगाव येथुन दसऱ्याच्या दिवशी मुऱ्हा एकविरा देवीला बोळवण

## शतकापासून चालत आलेली परंपरा आजही कायम



अंजनगाव सुर्जी दि. १४ : अंजनगाव तालुक्यातील मुऱ्हा येथील एकविरा देवीचे देवस्थान तालुक्यातच नव्हे तर संपुर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. नवरात्रीमध्ये नऊ दिवस तालुक्यातील भक्त पायदळवारी करून दर्शन घेण्यासाठी येतात.नवरात्रीचे नऊ दिवस उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. आणी नवमी ला महाप्रसादचा कार्यक्रम असतो.तर दसऱ्याच्या दिवशी विहिगाव येथुन मुऱ्हा एकविरा देवीला बोळवण आणुन घट उठवाण्याची प्रथा शतकापासून चालत आलेली परंपरा आज पण कायम आहे.विहीगाव येथील ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे की मुऱ्हा एकविरा देवी विहिगाव या गावाची लेकबाय तर चिंचोली हे मामकुळ आहे.विहिगाव येथील भांबुरकर, काळे, भोरकडे, राऊत या वतनदारांना प्रत्येक वर्षी एकाला बोळवण नेण्याचा मान दिला जातो. वाजत गाजत मुऱ्हा गावात बोळवण पोचल्यानंतर नागरिक आदराने त्यांचे स्वागत करतात. ही परंपरा शतकापासून चालत आलेली आहे. असे म्हटल्या जात आहे.संपुर्ण विधी संपल्यानंतर परत विहीगाव येथे परत आल्यानंतर पूर्ण गावामध्ये असलेल्या देवतांची पुजा करतात. विशेष म्हणजे एकाच दिवशी पूर्ण गावात सर्व देवता जवळ नारळ फोडल्या जाते.

विहिगाव येथील लक्ष्मी आई देवस्थान मधून मुऱ्हा एकविरा देवी येथे भव्य पालखीचे आयोजन करण्याच आले होते. या प्रसंगी लहान बालिकानी विविध देवीचे रुप धारण केले होते. बालिकानी विवीध रुपात आपले नृत्य सादर केले. या पालखीमध्ये बहुसंख्यने भाविक भक्त सहभागी झाले होते.

# मुंबईहून उड्डाण करणाऱ्या तीन फ्लाइटमध्ये बॉम्बची धमकी

मुंबई दि. १४ : मुंबईहून उड्डाण करणाऱ्या तीन फ्लाइटमध्ये बॉम्बची धमकी देण्यात आल्याने एकच खळबळ उडाली. एअर इंडियाचे पहिले विमान मुंबईहून न्यूयॉर्कला जात होते. माहिती मिळताच विमान दिल्लीकडे वळवण्यात आले. हे विमान सध्या दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आहे. विमानात २३९ प्रवासी होते. दुसरी फ्लाइट इंडिगोची ६ए-१२७५ आहे, ती मुंबईहून मस्कतला जात होती. तिसरी फ्लाइट इंडिगोची ६ए ५६ आहे. ते मुंबईहून जेद्दाहला जात होते. या दोन्ही विमानांना विलगीकरणात ठेवून त्यांची तपासणी केली जात आहे. सध्या सर्व प्रवाशांना विमानातून उतरवण्यात आले आहे. इथे मुंबई-हावडा मेललाही बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली होती. मात्र, तपासणीनंतर गाडी रवाना करण्यात आली.

# मनातं आलं म्हणून...




## सर्व कसं फ़रफेक्ट पाहिजे राव....

सगळं कसं सुरळीत, सर्व कसं फ़रफेक्ट, सर्व कसं चांगल, माझ्या मनासारखं, मला वाटेल तसं. लोकांनी मी म्हणेल तसंच वागावं...त्याच वेळेवर व्हावं ही आस. .. सर्व कसं मनासारखं हवं...ही इच्छा मनाला जीवन प्रवाह विरोधी करते,. जीवनाची आपली एक गती आहे ,नाही का? मला वाटेल तसं होईल असं वाटणे व अशी इच्छा दुःखाकडे मनुष्यास घेऊन जात नाही का? जीवन सर्वसमावेशक आहे त्याची समावेशकता ही दुःख आणि सुख याच सारखं मापं देते.

चांगल्या सोबत वाईट येणेच आहे. वाईट आहे म्हणून चांगल्याचे आकर्षण आहे. व चांगल आहे म्हणून वाईट हे असच आहे. पण जीवन हे संपूर्ण आहे,. त्याची संपूर्णता ही सुखाला आणि दुःखाला ही सोबत आणते,. पण आम्हाला सर्व चांगले पाहिजे. वाईट नकोच मग ते आले कि आम्ही दुःखी होतं राहतो, त्याची सम्पूर्णता ही स्वीकारायला हवीच,

आमचा अस्विकार आम्हाला जीवन प्रवाह विरोधी बनवत नाही का? जीवनाची विविध पैलू आहेत. .. निसर्गात पण पहाड आहेत उंच गगनभेदी तर खोल दऱ्यापण आहेत, निसर्गात शाकाहार करणारे प्राणी आहेत तर दुसऱ्याला भक्ष करणारे भयावह प्राणी पण. वृक्षवेळींनी भरलेले जंगल आहेत तर ओसाड आणि कोरडा वाळवंट सुद्धा...

सुंदर सकाळ तर काळरात्र आहेच की. ..इतरांच्या मदतीला धावून जाणारे देवमाणसं आहेत आणि इतरांचे व मेलेल्याच्या टाळू वरचे लोणी खाणारे देखील. शक्तिशाली तारुण्य आहे तर कमजोर म्हातारपण देखील.

आकर्षक सोंदर्य तर कुरूपता देखील. प्रचंड प्रेम आहे तर जीवघेणा रागदेखील, फुल आहेत काटे देखील, मला वाटते म्हणून मी चिरतरुण राहणार आहे का? आज गर्दी आहे माझ्याभोंवती तर उद्या भयावह एकांत देखील मिळणारच. आरोग्य आहे तर रोग सुद्धा.. जीवनाची ही समावेशकता जीवन संपुर्ण करत नाही का? पण केवळ चांगलच हवं ही अपेक्षा माणसाला अधिक दुःखी करते, ,एकदंरीत स्वीकार माणसाला प्रवाहा नेत जीवन सुसह्य बनवतो. नाही का ?

**डॉ. लोभस घडेकर**
**अमरावती, मो. ७८७५३५५८८८**

# राजर्षी शाहू महाराज वाचनालयाचे जागेसाठी उपोषण सुरूच

## उपोषणाचा आठवा दिवस : अद्यापही तोडगा नाही




तिवसा दि.१४ : येथील राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे जागेच्या मागणीसाठी सुरु असलेले बेमुदत उपोषण आठव्या दिवशीही सुरूच आहे. प्रशासनाकडून यासंदर्भात अद्यापही तोडगा काढण्यात आलेला नाही.

शासकीय पत्रानुसार वाचनालयाला मंजूर झालेली जागा ६ महिने होऊनही ताब्यात देण्यात न आल्याने वाचनालय पदाधिकारी व नागरिक यांनी शहीद सचिन श्रीखंडकर स्मारकजवळ बेमुदत उपोषण सुरु केले. आज या उपोषणाला ८ दिवस होऊनही उपोषणकर्त्यांच्या मागणीला न्याय न मिळता याउलट उपोषण मागे घेण्याच्या सूचना देण्यात येत आहे. या उपोषणातील रास्त मागणीला सामाजिक, राजकीय व धार्मिक मंडळींनी पाठींबा देत आपले मनोगत वाचनालयाला जागा देण्याबाबत व्यक्त केले आहे. उपोषणाला राजाभाऊ देशमुख,संजय वाट,राहुल धडांगे, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, अंकुश प्र देशमुख, सुमित अनासाने, दीपक धानोरकर आदी मंडळी बसत आहे. आज या उपोषणाला भाजपाचे माजी खासदार डॉ अनिल बोन्डे व भाजपा पदाधिकारी यांनी भेट देऊन वाचनालयाला ही जागा देण्याबाबत मत व्यक्त केले.

प्रभात मे रोज ४ खेळ १२।,३।,६।,९। वा.




प्रिया मध्ये रोज दोन खेळ १२।, ३। वाजता रोज दोन खेळ ६।,९। वाजता







सरोज मे रोज ४ शो १२।,३।,६। और ९। बजे कृपया शो टाईम पर ध्यान दे




राघव तळेगावमध्ये रोज ४ खेळ १२,३,६ और ९ बजे

